**नियमित दिवाणी मुकदमा क्र.६/२०१९ मधील नि.१८ खालील आदेश**
**(पद्मावती दिलीप सांगले वगैरे–६ *विरुध्द* वसंत हरी परीट वगैरे–१५)**
**[CNR-MHSN090000212019]**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ यांनी सी.पी.सी. ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.९ यांनी सदर अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीने वादीच्या दाव्यास दि.०३.०६.२०१९ रोजी म्हणणे दाखल केलेले आहे. तसेच, प्रतिदावा व स्थगिती अर्जही दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल करताना पॅरा ८ मध्ये पान नं.३ वर प्रतिवादीचे मिळकतीचे वस्तुस्थितीचे वर्णन करताना प्रतिवादीचा गोठा दक्षिण बाजुस असून नजर चुकीने सदर गोठा उत्तर बाजुस असल्याचे टायपिंग झालेले आहे. तसेच, प्रतिदावा करीत असताना त्यामधील पॅरा कलम १ पान नं.५ वर उत्तर बाजुस नमुद झालेली आहे. तसेच, दाव्यात दाखल केलेल्या स्थगिती अर्जातही पॅरा कलम १ व ३ मध्ये उत्तर बाजुस गोठा असल्याचे नजर चुकीने टायपिंग झालेले आहे. तरी सदर शब्दावर काट मारुन उत्तर बाजु ऐवजी दक्षिण हा शब्द लिहीणेस प्रतिवादींना परवानगी मिळावी. तसेच, प्रतिवादींनी प्रतिदावासोबत कच्चा हातनकाशा दाखल केलेला आहे. त्यांचे वर्णन प्रतिदावा मधील पॅरा नं.२ मध्ये तसेच, स्थगिती अर्जाचे पॅरा कलम २ मध्ये केलेले आहे. परंतु, नजरचुकीने नकाशावर ABCD व EFGH असे मार्किंग करणेचे राहुन गेलेले आहे. तरी कच्चा हातनकाशावर तसे मार्किंग करणेची परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही आणि मुळ दावा बदलणार नाही. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादी क्र.१४ व १५ व वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दावा गुणदोषावर चालणेस न्यायालयास मदत होणार आहे. परंतु, अशी दुरुस्ती न झालेस प्रतिवादी क्र.९ यांचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.९ यांनी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि.२२ कडे त्यांचे म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे. वादी यांनी असे अभिकथन केले आहे की, प्रस्तुत प्रतिवादी यांचा प्रतिदावा दुरुस्तीचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी यांना अर्ज करण्याचा कोणताही हक्क

व अधिकार नाही, अर्ज करण्याचे कोणतेही कारण कधीही घडले नव्हते. प्रतिवादी यांचा अर्ज मुदतीच्या कायद्यानुसार मुदतीत नाही. प्रतिवादी क्र.९ यांना दाव्याची समन्स व नोटीस दि.२१.०२.२०१९ रोजी मिळालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी सुमारे तीन महिन्यानंतर म्हणजे ९० दिवसानंतर कोणत्याही अर्जाविना सदर कामी कायदाबाह्य कैफियत व कौंटर क्लेम मे.कोर्टाची दिशाभुल करुन दाखल केलेला आहे. सबब याही कारणास्तव प्रतिवादी यांचा कौंटर क्लेम व त्यामधील तुर्तातुर्त ताकीद अर्ज हा कायदाबाह्य असल्याने तो रद्द करण्यात यावा. प्रतिवादी यांनी अर्जात मागितलेली दुरुस्ती ही कायदाबाह्य व चुकीची असून सी.पी.सी. मधील तरतुदीनुसार तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये दुरुस्ती ही कायद्याने मागता येत नाही. तसेच, सी.पी.सी. ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे कायद्यात तरतुद नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जात केलेली मागणी ही कायदाबाह्य असून तथाकथित दुरुस्तीमुळे प्रतिदाव्यातील वादीचा बचाव संपुष्टात येणार असून प्रतिदाव्याच्या स्वरुपात फरक पडणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी अर्जात केलेली मागणी ही रद्द करण्यात यावी व प्रतिवादीचा अर्ज रद्द करण्यात यावा. प्रतिवादी यांनी प्रतिदाव्यात दिलेला हातनकाशा हा चुकीचा व बेकायदेशिर असून कायद्याने सदर हातनकाशात कोणतीही दुरुस्ती करता येत नाही व तशी तरतुद कायद्यामध्ये नाही. वरील सर्व कारणास्तव प्रतिवादीचा अर्ज रद्द करण्यात यावा.

४. वास्तविक पाहता प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी दिलेल्या अर्जात तथाकथित दुरुस्तीबाबत दिलेली कारणे व विधाने ही चुकीची असल्याने व संयुक्तीक नसल्याने व त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी यांनी अर्जासोबत दाखल केली नसल्याने प्रतिवादीचा अर्ज हा खर्चासह रद्द करावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

५. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. दोन्ही पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द हद्दी कायम होवून मिळणेबाबत, अतिक्रमण क्षेत्र पाडुन, अतिक्रमण क्षेत्र काढून मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.९ यांनी सदर अर्जाद्वारे त्यांची कैफियत, प्रतिदावा, स्थगिती अर्ज व हातनकाशामध्ये दुरुस्ती मागितली आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार कैफियत पॅरा ८ मध्ये, प्रतिदावा पॅरा कलम १ मध्ये व स्थगिती अर्जाचे पॅरा १ व ३ मध्ये दावामिळकतीचा वस्तुस्थितीचे वर्णन करताना प्रतिवादीचा गोठा दक्षिण बाजुस असून नजरचुकीने सदर गोठा उत्तर बाजुस असल्याचे टाईप

झाले आहे. तसेच, हातनकाशा मध्ये नजरचुकीने ABCD व EFGH असे नमुद झाले नाही. अशी दुरुस्ती प्रतिवादी क्र.९ यांनी मागितली आहे. याऊलट वादीतर्फे विधीज्ञांनी असे युक्तीवाद केले आहे की, प्रतिवादी क्र.९ यांनी ९० दिवसानंतर कैफियत व प्रतिदावा दाखल केले नाही. तसेच, प्रतिवादी क्र.९ यांना सी.पी.सी. मधील तरतुदीनुसार तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये दुरुस्ती मागता येत नाही असे सांगितले आहे.

६. प्रतिवादी क्र.९ यांची कैफियत, प्रतिदावा, स्थगिती अर्ज व नकाशा पाहता मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती होणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप अगर त्यात कोणतेही मुलभुत बदल होणार नाही. याऊलट सदर दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वादमुद्दे निश्चित होवून त्या मुद्दयांवर गुणदोषात्मक अंतिम न्यायनिर्णय देणे योग्य व संयुक्तिक ठरणार आहे. यामुळे वादी अगर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, या सर्वांचा विचार करता प्रतिवादी क्र.९ यांचा अर्ज मंजूर करणेच्या निष्कर्षाप्रत मी पोहोचले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**:: आदेश ::**

१. प्रतिवादी क्र.९ यांचा नि.१८ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.९ यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करणेस परवानगी देणेत येते.

३. प्रतिवादी क्र.९ यांनी प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांत अर्जात मागितलेप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत याकामी सामील करावी.

Jyotimala Chandrashekhar Gupta

Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2019.12.03 11:16:51 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.३०.११ .२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil. |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 30.11.2019. |
| Order signed by the Presiding officer on | : | 03.12.2019. |
| Order uploaded on | : | 03.12.2019. |